जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाकरीता खाजगी वाहन पुरवठादारांकडून घेण्यात येणाऱ्या वाहनांचे दर करार निश्चित करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१४६/३१**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - ०७ ऑक्टोबर, २०१७.

**संदर्भ:-** १) शासन पत्र क्र. GADP-३१०२(१९)/२०/२०१३, दिनांक १८.०६.२०१५.
२) जिल्हाधिकारी, पुणे यांचे पत्र क्र.पीसीए-डिव्हीसी-१६-२०१६, दिनांक ०२.०७.२०१६.

**प्रस्तावना:-**

राज्यात येणाऱ्या राज्य अतिथी / मान्यवर यांच्या परिवहनाकरीता सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांच्या अधिनस्त डि.व्ही. वाहने ठेवण्यात आली आहेत. तथापि जिल्ह्याच्या ठिकाणी एकाच वेळी अनेक मान्यवर भेटीसाठी आल्यास व डि.व्ही. वाहने अपुरी पडल्यास खाजगी वाहन पुरवठादारांकडून भाड्याने वाहन उपलब्ध करुन घेण्याबाबत दरकरार करण्यात येतो. जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाकडील यापूर्वीचा दरकरार संपूष्टात आल्याने, भाडेतत्वावर वाहने घेण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयामार्फत ई-निविदा प्रक्रीया राबविण्यात आली होती. सदर ई-निविदा प्रक्रीयेनंतर निम्नतम दरास मान्यता देण्याची व या दराने जे खाजगी वाहन पुरवठादार वाहने पुरविण्यास तयार असतील त्या पुरवठादारांना शासन मान्य पुरवठादार म्हणून मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाकरीता पुणे जिल्ह्यास भेट देणाऱ्या सन्माननीय अतिथी व मान्यवरांच्या परिवहन व्यवस्थेसाठी शासकीय डि.व्ही. वाहने उपलब्ध नसताना खाजगी वाहन पुरवठादारांकडून भाड्याने वाहने पुरविण्याबाबत ई-निविदा प्रक्रीयेमध्ये प्राप्त झालेल्या निम्नतम दरपत्रकास (सोबतचे विवरणपत्र-अ) शासनाची मान्यता देण्यात येत आहे. या दराने तसेच निविदेतील अटी व शर्तीच्या अधिन राहून खालील पुरवठादारांकडून वाहने उपलब्ध करुन घेण्यासही या शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | वाहन पुरवठादाराचे नाव व पत्ता | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १. | **मे. ब्लू मेरीडियन्स हॉलिडेज प्रा. लि., पुणे.**<br>९५५/९५६, विद्या विलास को.ऑ.हौ.सो. प्लॉट नं.१३, दिप बंगला चौक, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६. | **क्र.** ०२० २५६७४२७७<br>**मो.** ९८२२ ६०४२७७ |
| २. | **मे. गायत्री इंटरप्रायजेस, पुणे.**<br>७६९/६, जोगळेकर क्वार्टर, डेक्कन जिमखाना, पुणे- ४११ ००४. | **क्र.** ०२० ६५२३२३०८<br>**मो.** ९८५० ०८९३५४ |
| ३. | **मे. देसरडा ट्रॅव्हल्स, पुणे.**<br>सर्वे नं. ३२/१/१, श्री मंगल को. ऑ. हौ. सो. धनकवडी पोस्ट ऑफीस समोर, धनकवडी, पुणे-४३. | **क्र.** ०२० २४३७३११८<br>**मो.** ९८२२ ०९५९२१ |

२. खाजगी पुरवठादाराकडून भाड्याने वाहने घेण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, पुणे यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. निविदा सुचनांमधील अटी व शर्तींच्या अधिन राहून सोबतच्या विवरणपत्रातील दर मान्य असलेल्या उपरोक्त पुरवठादारांचे पुणे जिल्ह्याकरीता पॅनेल तयार करण्यात यावे व वाहन पुरवठ्याबाबतचा आवश्यक तो दरकरार तात्काळ करुन घेण्यात यावा. तसेच निविदेतील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन होईल असे पहावे.
२. सदर दरकरार **दिनांक ०१.०९.२०१७ ते ३१.०८.२०१९ या दोन वर्षाच्या** कालावधीसाठी लागू राहील.
३. सदर दर करारामध्ये कोणतेही बदल वा सुधारणा करण्याचे अधिकार अंतिमत: शासनाचे राहतील.
४. खाजगी वाहने भाड्याने उपलब्ध करुन घ्यावयाची झाल्यास जिल्हाधिकारी, पुणे यांनी वरील शासनमान्य पुरवठादारांकडूनच वाहने उपलब्ध करुन घ्यावीत. मे. ब्लू मेरीडीयन्स हॉलिडेज प्रा. लि, पुणे या पुरवठादाराचे दर निम्नतम असल्याने प्राथम्याने कामे देण्याबाबत त्यांना विचारणा करण्यात यावी.
५. वाहन पुरवठा केल्यानंतर त्याबाबतची देयके पुरवठादारांना ३ महिन्याच्या आत अदा करणे अभिप्रेत आहे. त्यासाठी वाहने भाड्याने घेतल्यानंतर जिल्हाधिकारी, पुणे यांनी वाहन पुरवठ्याबाबतची देयके तात्काळ प्राप्त करुन घेऊन ती आपल्या शिफारशीसह ३० दिवसाच्या आत न चुकता शासनास सादर करावीत.
६. संबंधित पुरवठादारांनी वाहनाचा पुरवठा केल्यानंतर त्याबाबतचे देयके तात्काळ जिल्हाधिकारी, पुणे यांना सादर करावीत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१७१००७१४५०२४२००७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arvind Bhimrao More

Digitally signed by Arvind Bhimrao More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=203af2dfba7db2a4824298a34f2c9294f93396f53d7f87cd4d69fecf5cf7005f, serialNumber=9246b8ccd2e2cb10707678d45ea1ad26cc1e4d7bff7bd2aa1f253a716b8c448b, cn=Arvind Bhimrao More
Date: 2017.10.07 14:45:29 +05'30'

**(अ.भि.मोरे)**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**सहपत्र:- विवरणपत्र "अ"**

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, पुणे.
२. जिल्हाधिकारी, पुणे.
३. उप सचिव (आस्थापना) सर्व मंत्रालयीन विभाग.
४. सामान्य प्रशासन विभाग/का.२५, मंत्रालय, मुंबई.

५. वित्त विभाग/व्यय-४, मंत्रालय, मुंबई.
६. मे. ब्लू मेरीडियन्स हॉलिडेज प्रा. लि., पुणे.९५५/९५६, विद्या विलास को.ऑ.हौ.सो. प्लॉट नं.१३, दिप बंगला चौक, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.
७. मे. गायत्री इंटरप्रायजेस, पुणे. ७६९/६, जोगळेकर क्वार्टर, डेक्कन जिमखाना, पुणे- ४११ ००४.
८. मे. देसरडा ट्रॅव्हल्स, पुणे.सर्वे नं. ३२/१/१, श्री मंगल को. ऑ. हौ. सो. धनकवडी पोस्ट ऑफीस समोर, धनकवडी, पुणे-४३.
९. निवडनस्ती.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१४६/३१, दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१७ चे विवरणपत्र "अ"

भाडेत्री वाहने पुरविण्याचे न्युनतम दर दर्शविणारा तक्ता (सर्व कराव्यतिरीक्त)

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | ८ तास / ८० कि.मी. | १२ तास / १२० कि.मी. | २४ तास / २४० कि.मी. | बाहेरगावी २४ तास / ३०० कि.मी. | ८/१२/२४ तासा पुढील प्रत्येक तासाकरीता | ८०/१२०/२४० कि.मी. पुढील प्रत्येक कि.मी. करीता | बाहेरगावी प्रत्येक कि.मी. पुढील प्रत्येक कि.मी. दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | मर्सिडीज, ई-सिरीज | ११७०० | १६७४० | ३२४०० | ३५१०० | ११७० | ११७ | ११७ |
| २ | BMW,७-सिरीज | ०० | ०० | ४८६०० | ४८६०० | ०० | ०० | १६२ |
| ३ | होंडा ॲकॉर्ड / होंडा सिव्हीक | ३२४० | ५१३० | ११२५० | ९४५० | ३०० | ३२ | ३२ |
| ४ | टोयोटा करोला / टोयोटा अल्टीस | ३१०० | ४८५० | ८१०० | ८९०० | २४० | ३० | ३० |
| ५ | होंडा सिटी | २१०० | ३३३० | ५१३० | ७००० | २०० | २४ | २४ |
| ७ | टोयोटा इनोव्हा | २२०० | ३१०० | ४८०० | ५४०० | २०० | १६.७५ | १६.७५ |
| ८ | मिनीबस, १७ सिट | १३३०० | १६२०० | १९८०० | २१६०० | ३५० | ८० | ८० |
| ९ | मिनीबस, ३२ सिट | १५३०० | २२०५० | २५६५० | २४३०० | ६५० | ९० | ९० |

Arvind Bhimrao More

Digitally signed by Arvind Bhimrao More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=203af2dfba7db2a4824298a34f2c9294f93396f53d7f87cd4d69fecf5cf7005f, serialNumber=9246b8ccd2e2cb10707678d45ea1ad26cc1e4d7bff7bd2aa1f253a716b8c448b, cn=Arvind Bhimrao More
Date: 2017.10.07 14:46:59 +05'30'

(अ.भि.मोरे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन